# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**उप प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद**
पर्यावरण भवन, A - 4/1, चिकलठाणा औद्योगिक परिसर, सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल, जालना रोड, औरंगाबाद - ४३१ २१०.

**Office Contact No.** :
0240 - 2473462, 2473461,
**E-mail ID**:-
sroaurangabad1@mpcb.gov.in

**जा.क्र. / उप प्रा.अ. / 2020 /746** **दिनांक - 08 /०5/ 2020**

प्रति,

1. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.
2. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद.
3. मा. सह संचालक (जल प्रदूषण विभाग), मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा माळा, सायन सर्कल, सिने प्लॅनेट जवळ, सायन (पूर्व), मुंबई-२२.
4. मा. महा-व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद.
5. मा. तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, गंगापूर, कन्नड, वैजापूर व फुलंब्री.
6. मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कार्यालय, सिल्लोड, गंगापूर, कन्नड, वैजापूर व फुलंब्री.
7. **ग्राम पंचायत कार्यालय,** (i) भवन, केहाळा, चिंचखेडा, धानोरा, माढा खु., खोडकई वाडी, कोटनांद्रा, सीसारखेडा, ता. सिल्लोड. (ii) शेंदूरवादा, ता. गंगापूर (iii) देवळी, जवखेडा खु., रोजवेंपूर, सेलगाव १, ता. कन्नड (iv) झोलेगाव, अवलगाव, जळगाव, मांडकी, लासूरगाव, भालगाव, ता. वैजापूर (v) वानेगाव खु. बुद्रुक २ , ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.
8. मा. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
9. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळ मजला, पूर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिविल लाइन्स, नागपूर.

**विषय - औरंगाबाद जिल्ह्यामधील २० रेती घाटांचे पर्यावरणविषयक जाहीर लोक सुनावणी बाबत.**

**संदर्भ –**

१. जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचे कडून प्राप्त झालेले पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी २० रेती घाटांचे अहवाल / अर्ज (ई-मेल द्वारे).
२. मा. अवर सचिव, महसूल व वन विभाग यांचे दिनांक २७.०४.२०२० रोजीचे पत्र.

..............

उपरोक्त विषयास अनुसरून या कार्यालयाकडे जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचेकडून औरंगाबाद जिल्ह्यातील २० रेती घाटांचे पर्यावरण विषयक मान्यतेसाठीचे प्रस्ताव प्रस्तावित जाहीर लोक सुनावणी साठी प्राप्त झालेले आहेत. सदरील अर्जाच्या अनुषंगाने वरील प्रस्तावित प्रकल्पांची जाहीर जन सुनावणी दि. १५.०६.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी बाबतची नोटीस मराठी (दै. सकाळ) व इंग्रजी (टाइम्स ऑफ इंडिया) या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात येईल तसेच संबंधित कार्यालयाने सदर नोटीसच्या छायांकित प्रति काढाव्यात व लोकांच्या माहिती / अध्ययनसाठी उपरोक्त नोटीसच्या प्रति आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात याव्यात.

सदर प्रकल्पाचा पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल / पर्यावरण व्यवस्थापन योजना (Environment Management Plan) व कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी भाषेमध्ये) (Executive Summary in English and Marathi) यांचा संच या कार्यालयाने ई मेल द्वारे आपल्या कार्यालयास सादर करण्यात आलेले आहेत, सदर दस्तावेज संबंधित व्यक्तीस अवलोकनाकरिता / अभ्यासनाकरिता शासकीय कालावधीमध्ये कार्यालयामध्ये उपलब्ध करून देण्यात यावे.

सदर नियोजित जन-सुनावणी दरम्यानचा कालावधी हा जागतिक आपत्ती असलेल्या COVID-19 या आजाराचा सर्व देशामध्ये प्रादुर्भाव असून LOCKDOWN परिस्थिती असल्यामुळे नागरिकांना प्रत्यक्ष जमणे शक्य ना झाल्यास Cisco Webex app द्वारे घेण्यात येणार आहे. सदर वाळू / रेती घाटांच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवासी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांनी सूचना, टीका टिप्पणी लेखी, आक्षेप, तक्रारी या स्वरूपात ई मेल द्वारे sroaurangabad1@mpcb.gov.in नोंदविता येतील तसेच संबंधित कार्यालयाकडेहि नोंदवू शकतात. Cisco Webex app बाबत माहिती वृत्तपत्रातील जाहिरातीमध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, सदरहू अध्यादेशानुसार आपण आपल्या स्तरावर याबाबत प्रसिद्धी देऊन संबंधितांना आपले म्हणणे / सूचना / आक्षेप नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात यावे.

**सोबत - वरीलप्रमाणे.**

**(प्र. द. वानखेडे)**
उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद